# आदिवासी वाद्ये : आदिवासी संस्कृती प्रकटीकरणाचे प्रभावी माध्यम

**डॉ.कु.मंदा माणिकराव नांदुरकर** मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती e-mail : manunandurkar@yahoo.com

---

संगीत, नृत्य व गीत हा आदिवासींच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, या कलांना त्यांच्या जीवनात तसेच सामाजिक आणि धार्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. आदिवासींची वाद्ये बाजारात मिळत नाहीत, ती वाद्ये ते स्वतःच विधीवत बनवतात, त्यांची वाद्ये ते पक्ष्यांच्या विविध रंगातील पिसांनी, रंगीत मण्यांनी व रंगीबेरंगी गोंड्यांनी सजवतांना दिसून येतात. आदिवासी वाद्ये आजही त्यांच्या आदिम स्वरूपातच आहे, याला मुख्य कारण म्हणजे आदिवासी नृत्य आणि वाद्ये यांचा संबंध त्यांच्या धार्मिक कल्पनांशी जोडला आहे. उदा. वारल्यांचा 'तारपा', नारनदेवाने तर कोलामांचा 'डफ' लिंगाल देवाने परधानांचा 'राजनेंगी बाना' त्यांच्या लिंगापेन देवाने निर्माण केल्याचे संदर्भ लोककथेतून सापडतात. वाद्यांच्या साक्षीने बहरणारे नृत्य प्रत्येकाला थिरकावण्यास भाग पाडते.

**उद्दिष्ट्ये :**

- आदिवासींच्या वाद्यांची नावे माहिती करून घेता येणे.
- आदिवासीच्या जीवनात वाद्यांना मोलाचे स्थान दिसून येते.
- आदिवासी नृत्य व गीतला वाद्यांची साथ महत्त्वपूर्ण ठरते.
- आदिवासी वाद्ये वैशिष्ट्यपूर्ण आहेत, त्यांचा धार्मिक व सामाजिक संबंध जाणून घेता येणे.
- आदिवासींच्या वाद्यांची नावे व ती तयार करण्याची कृती अभ्यासणे.
- आदिवासी वाद्यांद्वारे आदिवासी संस्कृतीचा अभ्यास करण्यास भर पडते.

**ढोल** हे वाद्य आदिवासी नृत्यासाठी फार प्रसिद्ध आहे. बकऱ्याच्या कमावलेल्या कातड्याने ते मढवितात. ते वाजविण्याच्या अगोदर विस्तवावर शेकतात. त्या ढोलीची एक बाजू कधी टिपरीने किंवा दोन काड्यांनी वाजवितात. ढोलाचे दुसरे तोंड बोटांनी व मनगटाने वाजवितात. ढोल कधी जमिनीवर तर कधी गळ्यात अडकवून वाजविल्या जातो. दीड–दोनशे स्त्री–पुरूषांच्या नृत्याला साथ देणारा ढोलही तसाच मोठा असतो. ढोलाचा ध्वनी गंभीर व घुमणारा असतो. मंगलप्रसंगी ढोल वादनाला विशेष महत्व असते.

**ढोलकं** हे वाद्य आंब्याच्या किंवा वडाच्या पोकळ लाकडाच्या ओंडक्यापासून बनवितात. हाताच्या बोटांनी ढोलकं वाजवितात. ढोलक्यांच्या दोऱ्या सैल करून किवा घट्ट आवळून आवाजात चढउतार करता येतो. बहुतेक आदिवासी नृत्यात ढोलक असतो. ढोलक्यावरची थाप म्हणजे नृत्याला निमंत्रण असे समजतात.

**नगारा** ढोलाच्या मानाने लहान असतो, तो लग्नप्रसंगी वाजवितात. पावरी भाषेत नगाऱ्यास 'तुतडी' म्हणतात. लग्नप्रसंगी वा इतर वेळी केवळ ही वाद्ये वाजवून पोट भरणारे लोकही असतात.

**डफ** हे चर्मवाद्य आहे. चार ते पाच इंच लाकडी फळीच्या एका गोल कडेवर कामावलेले कातडे मढवितात, हे वाद्य बारीक काड्यांनी वाजवितात. डफाचा आवाज खणखणीत निघावा म्हणून वाजविण्यापूर्वी डफ विस्तवावर शेकवतात.

**मांदळ** सागवानच्या पोकळ गोल ओंडक्यास दोनही तोंडाला चामडे बसवून हे वाद्य तयार केले जाते. मोठ्या तोंडाला चिक्की लावून मग हे वाद्य वाजवितात. या वाद्यास 'माधळ' किंवा 'मादर' असेही म्हणतात. ढोलकीच्या आकारासारखे हे वाद्य असते.

**घंगळी** हे विणेच्या आकारासारखे वाद्य असते. 'वारली' जमातीचे आवडते वाद्य होय. या वाद्यात दोन दुधी भोपळे असतात. एका बाजूला वाकड्या तोंडाची वेळूची काठी बांधलेली असते, त्या काठीला वीणेच्या खुंट्याप्रमाणे दोन खुंट्या बसविलेल्या असतात. काठीच्या वाकड्या तोंडाला व खुंट्यांना तारा बांधतात. हे दोन्ही भोपळे बगलेत धरून छातीपुढे आलेल्या आडच्या तारांना दोन्ही हातांनी छेडतात व गाणे म्हणतात, एका गावात एखाददुसराच घंगळीवादक असतो. शुभप्रसंगी व आनंदाच्या प्रसंगी हे वाद्य वाजवितात. कणसरी म्हणजे सृजनाची देवता. कणसरी मातेच्या स्तुतीवर, धान्याची रास पडल्यावर, मुलाच्या जन्मप्रसंगी हे वाद्य वाजवून वारली नृत्य करतात.

**तारपा** सुकलेला लांबट दुधी भोपळा, बांबूच्या दोन नळ्या आणि ताडाची पाने यांच्या साह्याने हे वाद्य बनवितात. गारूडीच्या पुंगीसारखे हे वाद्य दिसते. बांबूच्या नळ्या भोपळ्याच्या एका बाजूस असतात. त्या आवळ्याच्या पाव्यासारख्या असतात आणि दुसऱ्या बाजूस भोंगा असतो. हा भोंगा माडाच्या झावळापासून तयार करतात. एक जण तारपा वाजवितो आणि वर्तुळाकार फेर धरून इतर नृत्य करतात. तारपा वाजविणाऱ्याच्या सुरातील बदलाप्रमाणे नर्तकांच्या पदन्यासही बदलतो.

**काथ्या** हे वाद्य तांबे किंवा काथ्याच्या भांड्यापासून बनवितात. भांड्याच्या फुगीर भागावर मढविलेले कातडे बसविलेले असते. त्याला लांब केस लावतात. त्यातून मधुर ध्वनी निघतो.

**तुणतुणे** पोकळ भांड्याला खालच्या बाजूने कमावलेले कातडे जाणून तार बसविलेले असते. त्याला घोड्याचे केस किंवा तार बांधतात, वर एक काठी असते. अंगठ्याजवळच्या बोटाच्या साह्याने किंवा काडीने आघात करून हे वाद्य वाजवितात. हे वाद्य ढोलकीबरोबरच वाजवितात.

**ताशा** हे टोपलीच्या आकाराचे चर्मवाद्य आहे. दोन्ही हातात काड्या घेऊन गळ्यात अडकवलेला ताशा वाजवितात, ताशा मंगलप्रसंगी वाजविण्याची प्रथा आहे.

**किंगरी** हे तंतुवाद्य धनकुलीच्या साह्याने वाजवितात. या स्वरवाद्यात ताराऐवजी घोड्याचा केस बसविलेला असतो. किंगरीवादकास 'थोटी' म्हणतात.

**टिमकी** मातीच्या वाडग्यासारख्या भांड्यावर कातडे कसून टिमकी हे वाद्य बनविले जाते. छोट्या काड्यांनी कमरेला बांधून हे वाद्य वाजवितात.

**चिटकोरा** हे वाद्य म्हणजे चिपळ्यांची मोठी वाढविलेली आवृत्ती होय. एकाच हातात चिटकोऱ्याचे दोन्ही भाग धरून वाजवितात.

**कुंडुडी** हे वाडग्यासारखे दिसणारे वाद्य आहे. त्याच्या पसरट भागाला लावलेली कातडी ताणून बसविलेली असते. दोन बारीक काड्या हातात धरून कुंडुडी वाजवितात.

**तूर** हे पितळी किंवा काशाच्या थाळीवरचे छोट्या ढोलासारखे वाद्य आहे. काशाच्या थाळीत तुरीचा सर मेणाच्या साह्याने उभा लावतात. त्या काडीवर वरून खाली बोटे फिरविली की गोड सुर लागतो. त्या सूरात कथागीते गातात व नृत्य करतात.

**पिरी** हे हरणाचे शिंग तोंडाने वाजवितात त्यास 'पिरी' म्हणतात. पावरी जमातीत यालाच 'पिरी' म्हणतात. हरणाचे शिंग, बांबू व वाळलेली पोकळी दुधी यापासून हे वाद्य बनवितात. याचा आवाज फार मंजूळ असतो.

**घुंगरू** हे वाद्य मुख्यतः तालासाठी असते. पोकळ पितळी गोलात आवाज येण्यासाठी एक लहानसा खडा टाकतात. काठीला किंवा कमरेला घुंगराचा माळा बांधतात. त्यातून मंजूळ ध्वनी निघतो.

**बना** हे वाद्य परधान जमातीचे अत्यंत प्रिय वाद्य आहे. बना वाद्य साधारणपणे वैशाख महिन्यातील एखाद्या रविवारी बनवितात. त्या दिवशी उपवास करतात. जंगलात एकटे झाड निवडून त्याला बळी अर्पण करतात. दुसऱ्या दिवशी तोडून आणून देवदेवतांची गीते गात वाद्य तयार करतात. रोज सकाळी थोडेसे का होईना बना वादन करून दिवसाची सुरूवात केली जाते. अशी माहिती बनाजी, चंद्रपूर यांनी दिली.

**टिपऱ्या** लाकडाच्या काठ्या कातून गोल करतात. त्यांची दोन्ही टोके जराशी निमुळती असतात. क्रीडाप्रधान नृत्याला तालासाठी अशा टिपऱ्यांचा उपयोग केला जातो.

**पावा** डफाबरोबर प्रामुख्याने 'पावा' हे वाद्य असते. बासरीपेक्षा थोडे मोठे असे हे वाद्य आहे. अडीच ते तीन फूट लांबीचे व वेळूपासून बनविलेले हे वाद्य असते. त्याला तेल वगैरे लावून त्याची चांगली निगा राखतात.

कोरकूंचे गप्पा–टप्पा हे वाद्य लाकडापासून कोरून बनवितात. भजनाच्या टाळासारखा ह्याचा आकार असतो. भिल्लांच्या इंदल पूजेतील 'झामलो' हेही टाळासारखे असते. मंजिरा, चिटकोरा हेही टाळाचेच प्रकार आहेत.

आदिवासींची वाद्ये त्यांच्या परिसरात उपलब्ध असलेल्या वस्तूंपासून बनविलेली असतात. भोपळा, बांबू, लाकूड, कातडे, घोड्याचे केस, मातीची मडकी, माठ, परात, थाळ्या, पत्र्याचे डबे अशा विविध वस्तुंपासून वाद्ये बनवितात आणि ते वाद्य बनवित असतांना त्यांच्यावर परिश्रम घेतात. कोलामांचा डफ बनवित असताना बकऱ्यांचे कातडे एका विशिष्ट पद्धतीनेच स्वच्छ करतात. त्यावरील केस अतिशय परिश्रमपूर्वक काढतात कारण एक जरी केस राहीला तर त्याच्या आवाजात फरक पडतो असे ते म्हणतात.

वारल्यांचे 'तारपा' आणि कोकणा, भिल्लांचा पावरा हे वाद्य फक्त भगतच वाजवितो म्हणून त्याला देवाचे वाद्य म्हणतात. एक विशिष्ट आकाराचा भोपळा शोधून तो कोरतात आणि त्यापासून हे वाद्य करतात. तारपा वाद्य सुद्धा सुकलेला लांबट दुधी भोपळा, बांबूच्या दोन नळ्या, ताडाची पाने आणि माडाच्या जापड्या पासून बनवितात. एकजण तारपा वाजवितो आणि त्यातील सुराच्या बदलाप्रमाणे नर्तकांचा पदन्यासही बदलतो. बासांपासून केलेली बासुरी इत्यादी वाद्ये सुषिर वाद्यात मोडतात.

पागई सुद्धा ढोलासारखेच वाद्य असते. ती मातीची असते. नगारा ढोलाच्या मानाने लहान असतो.

**निष्कर्ष :**

- आदिवासी वाद्यांद्वारे आदिवासींच्या चालीरिती, परंपरा जोपासल्या जातात.
- गीत, नृत्य, संगीत यांना वाद्याची साथ असणे अतिशय मोलाचे ठरले.
- वाद्यांच्याद्वारे आदिवासी संस्कृती अभ्यासण्यास मोलाची मदत होते.
- आदिवासींची वाद्ये आदिवासी स्वतः तयार करतात.
- वाद्यांप्रमाणेख तालाशी जुळणाऱ्या विविध हाकारातून आणि हुंकारातून भावभावना प्रकट होतात.

एकूणच आदिवासींच्या संस्कृतीचा अभ्यास करतांना 'आदिवासींची वाद्ये' प्रभावी माध्यम ठरतात, हे लक्षात येते.

**संदर्भ :**

आदिवासी विश्व – डॉ. सो. शैलजा देवगांवकर, डॉ. श. गो. देवगांवकर, आनंद प्रकाशन, नागपूर
आदिवासी लोकगीतांतील स्त्री जीवन – डॉ. अलका हिवाळे, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद